# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांक:15.01.2026** **वार:गुरुवार**

1. राज्यातील 29 महानगरपालिकांच्या निवडणुकीसाठी आज मतदान
2. शेती अधिक शाश्वत आणि पर्यावरणपूरक बनवण्यासाठी सरकार सतत काम करत असल्याचं पंतप्रधानांचं प्रतिपादन
3. चोविसावा पुणे आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव आजपासून आणि
4. पन्नास षटकांच्या दुसऱ्या सामन्यात न्यूझीलंडचा भारतावर सात गडी राखून विजय

**निवडणूक**

राज्यातील 29 महानगरपालिकांच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी आज मतदान होत आहे. एकंदर 2 हजार 869 जागांसाठी ही निवडणूक होत असून 3 कोटी 48 लाखांपेक्षा जास्त मतदारांकरिता 39 हजार 92 मतदान केंद्रांची व्यवस्था करण्यात आली आहे. निवडणूक रिंगणात 15 हजार 908 उमेदवार आहेत. महानगरपालिकांच्या निवडणुकांमध्ये मोठ्या संख्येनं मतदान करून आपणही आपल्या शहरांच्या- महानगरांच्या जडणघडणीत योगदान द्यावं आणि लोकशाही प्रक्रियेत सक्रीय सहभाग नोंदवावा असं आवाहन राज्य निवडणूक आयुक्त दिनेश वाघमारे यांनी केलं आहे. आपलं मत आपल्या शहराचं भवितव्य ठरवू शकतं. कारण ते अनमोल आहे. लोकशाहीतला तो आपला महत्वाचा हक्क आहे आणि तो आपण मतदानाच्या माध्यमातून बजवायला हवा, त्यासाठी आपण नक्की मतदान करावं असं वाघमारे यांनी आपल्या संदेशात म्हटलं आहे.

**पंतप्रधान**

शेती अधिक शाश्वत आणि पर्यावरणपूरक बनवण्यासाठी सरकार सतत काम करत असल्याचं पंतप्रधान मोदी यांनी काल सांगितलं. केंद्रीय माहिती आणि प्रसारण राज्यमंत्री डॉ. एल. मुरुगन यांच्या नवी दिल्लीतील निवासस्थानी आयोजित पोंगल उत्सवात सहभागी झाल्यानंतर उपस्थितांना संबोधित करताना ते बोलत होते. येत्या काळात शाश्वत शेती पद्धती, पाणी व्यवस्थापन, प्रति थेंब अधिक पीक, नैसर्गिक शेती, कृषी तंत्रज्ञान आणि मूल्यवर्धन ही महत्त्वाची भूमिका बजावतील असं निरीक्षण त्यांनी नोंदवलं. ते म्हणाले...

हमारे किसान राष्ट्र निर्माण के मजबूत साथी हैं। उनके प्रयासों से आत्मनिर्भर भारत अभियान को बहुत मजबूती मिल रही है। केंद्र सरकार भी किसानों को सशक्त बनाने के लिए प्रतिबद्ध होकर लगातार काम कर रही है। साथियो पोंगल का त्यौहार हमें प्रेरित करता है की प्रकृति के प्रति आभार केवल शब्दों तक सीमित ना रहे, उसे हम जीवन शैली का हिस्सा बनाएं। जब यह धरती हमें इतना कुछ देती है तो उसे संजोने का दायित्व भी हमारा है। अगली पीढ़ी के लिए मिट्टी को स्वस्थ रखना पानी को बचाना और संसाधनों का संतुलित उपयोग करना सबसे जरूरी है। मिशन लाइफ, एक पेड़ मां के नाम, अमृत सरोवर जैसे हमारे अभियान इसी भावना को आगे बढ़ाते हैं। हम खेती को अधिक सस्टेनेबल और पर्यावरण के अनुकूल बनाने के लिए निरंतर काम कर रहे हैं।

**प्रजासत्ताक आमंत्रण**

रायगड जिल्ह्यातील नेरळचे प्रगत शेतकरी चंद्रशेखर भडसावळे यांना प्रजासत्ताक दिनानिमित्त दिल्लीत राजपथावर होणाऱ्या कार्यक्रमासाठी राष्ट्रपती कार्यालयाकडून आमंत्रित करण्यात आलं आहे. भडसावळे यांनी अभिनव शेती पद्धतीद्वारे पारंपरिक शेतीत अनेक यशस्वी प्रयोग केले आहेत. त्यांच्या कार्याबद्दल विविध राष्ट्रीय तसंच आंतरराष्ट्रीय पुरस्कार त्यांना मिळाले आहेत. प्रजासत्ताक दिनाच्या आमंत्रणाबद्दल आनंद व्यक्त करताना ते म्हणाले...

पन्नास वर्ष जी धडपड करत होतो या धडपडीच्यासाठी त्या धडपडीला मिळालेली ही पोचपावती आहे म्हणजे ते कधी आम्हाला कधी समोर बोलावतील प्रकाशझोतामध्ये बोलावतील अशी कधी कल्पनाही नव्हती म्हणजे आशाच नव्हती आशा सोडून दिलेली होती पण एका एकीही एवढं हे आमंत्रण आलंय आम्हाला समजलं ही फार मोठी गोष्ट झाली असं मला वाटतं संपूर्ण महाराष्ट्राच्या शेतकऱ्यांचा हा बहुमान आहे असं मला वाटतं.

**माजी सैनिक**

भारतीय लष्कराचे पहिले कमांडर-इन-चीफ फील्ड मार्शल के. एम. करिअप्पा यांच्या अतुलनीय सेवेचा आणि वारशाचा सन्मान करण्यासाठी दरवर्षी 14 जानेवारी ला सशस्त्र सेना माजी सैनिक दिन साजरा केला जातो. हा दिवस देशभरात 34 राज्य सैनिक मंडळे आणि 434 जिल्हा सैनिक मंडळांच्या माध्यमातून काल साजरा करण्यात आला.

निवृत्त सैनिकांच्या सेवेसाठी या वर्षभरात लष्कराच्या दक्षिण विभागाद्वारे 100 नमन केंद्र सुरू केली जातील असं लष्कराच्या दक्षिण विभागाचे प्रमुख लेफ्टनंट जनरल धीरज शेठ यांनी काल पुण्यात सांगितलं. दहाव्या सेवानिवृत्त सैनिक दिनानिमित्त भारतीय वायु दलाच्या पुणे तळाद्वारे आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.

माजी सैनिक विशेषतः कर्त्तव्य बजावत असताना जखमी झालेल्या सैनिकांच्या पुनर्वसनासाठी कार्यरत असलेले सेवानिवृत्त डॉक्टर कॅप्टन चंद्रशेखर चितळे यांनी या दिनानिमित्त आकाशवाणीशी बोलताना त्यांच्या कार्याविषयी माहिती दिली...

सैन्यात काम करत असताना अपंग झालेल्या सैनिकांना त्यांच्या पुनर्वसनासाठी काही प्रशिक्षण देतो वेगवेगळे कोर्सेस आम्ही चालवतो असं वाटलं की या लोकांसाठी विद्यापीठाने काहीतरी करावं त्यामुळे आम्ही एक डिप्लोमा इन इंडस्ट्रियल एडमिनिस्ट्रेशन अँड सर्व्हिसेस मॅनेजमेंट हा एक बारावी नंतरचा एक डिप्लोमा आम्ही तयार केला आणि आम्ही एक वर्षाचा एक मॅनेजमेंटचा डिप्लोमा की जेणेकरून त्यांना मॅनेजमेंट थोडं एक्सपोजर मिळेल हा कोर्स फारच चांगला चालला आहे पॅंडेमिकच्या दरम्यान थोडासा ऑनलाईन केलं हा विशेष म्हणजे या प्रोग्रामला पुणे विद्यापीठ एक काही फी घेत नाही आम्ही एक सोशल रिस्पॉन्सिबिलिटी म्हणून सुरू केला त्याच्यानंतर आम्ही दरवर्षी दहा दिवसाचा प्रोग्राम अंतपेनरशिप डेव्हलपमेंट त्यात उद्योजक होण्यासाठी काय आवश्यकता आहे असे आम्ही थोडासा प्रोग्राम केला डिसेबल सोल्जर्स वेगवेगळ्या क्षेत्रामध्ये उद्योजक झालेले आहेत आणि चांगलं काम करतात.

**पिफ**

पुणे फिल्म फाउंडेशन, सांस्कृतिक कार्य विभाग, महाराष्ट्र शासन आणि दादासाहेब फाळके चित्रनगरी, मुंबई यांच्याद्वारे आयोजित चोविसावा पुणे आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव आजपासून सुरू होत आहे. भारतीय चित्रपट सृष्टीतील योगदानाबद्दल ज्येष्ठ अभिनेते बिस्वजित चॅटर्जी, ज्येष्ठ अभिनेत्री फरीदा जलाल आणि ज्येष्ठ अभिनेत्री आशा काळे यांना 'पीफ डिस्टींग्वीश ॲवार्ड', तर ज्येष्ठ व्हायोलिन वादक आणि संगीतकार अमर हळदीपूर यांना संगीत क्षेत्रातील योगदानासाठी संगीतकार एस. डी. बर्मन आंतरराष्ट्रीय पुरस्कार देऊन गौरविण्यात येणार असल्याचं पिफचे अध्यक्ष आणि संचालक डॉक्टर जब्बार पटेल यांनी सांगितलं. या महोत्सवाबाबत आकाशवाणीला दिलेल्या विशेष मुलाखतीत बोलताना ते म्हणाले...

पुणे इंटरनॅशनल फिल्म फेस्टिवल हे चोविसावं वर्ष आहे आणि यावर्षी तुमच्या भेटीला अनेक जागतिक सिनेमे, भारतीय सिनेमे आणि मराठी सिनेमे आणतो आहोत. शिवाय वर्कशॉप्स आहेत ज्या ठिकाणी विचारमंथन होईल आणि तुमच्या पदरी पुष्कळ काहीतरी चांगलं येईल. आज आकाशवाणीच्या माध्यमाने मी तुम्हाला आव्हान करतोय मग या तुम्ही या ठिकाणी सगळी तरुणाई असते भरपूर. गर्दी असते आणि उत्तम जगातले सिनेमे जे गाजतायेत ते आहेत. विशेष म्हणजे या वर्षी नऊ ऑस्कर साठी गेलेले सिनेमे आपण दाखवतो आहोत. नऊ आहेत आणि बाकीचे जवळ जवळ एकशे पाच जागतिक सिनेमे आहेत. मराठी सात सिनेमे आणि शिवाय स्पर्धेत नसलेले पाच सिनेमे त्यानंतर भारतीय जवळ जवळ पंधरा सिनेमे असा एक प्रचंड मोठा साठा तुमच्या पुढे येणार आहे. शिवाय या वेगवेगळ्या, वर्कशॉप्स आहेत ज्यामध्ये चिंतन होणार आहे. ज्यांचे सिनेमे आ फेस्टिव्हल ला

स्पर्धेमध्ये आहेत ते साथी दिग्दर्शक मराठी सिनेमांच्या बद्दल बोलणार आहेत. मुख्य म्हणजे या सिनेमासाठी राबणारे जे तरुण लोक आहेत यांना भेटायला तुम्ही या मोठ्या कष्टाने सिनेमा करायला लागतो. खूप पैसा लागतो आणि त्या तरुणांची उमेद जी असते ती अवलंबून असतं तर जरूर या या तरुणांना सगळ्यांना आपण उत्तम उमेद द्याल.

**<u>सल्ला</u>**

ईराणमधील बिघडलेली सुरक्षितता व्यवस्था आणि सुरू असलेल्या हिंसक आंदोलनांच्या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारनं सावधगिरीचा सल्ला प्रकाशित केला आहे. परराष्ट्र मंत्रालयानं सर्व भारतीय नागरिकांना पुढील सूचना मिळेपर्यंत ईराणचा प्रवास टाळण्याचा इशारा दिला असून, जे नागरिक सध्या तिथं वास्तव्यास आहेत त्यांना तातडीनं उपलब्ध साधनांनी देश सोडण्याचा सल्ला दिला आहे.

**<u>व्हिसा</u>**

अमेरिकेनं पाकिस्तान आणि बांगलादेशसह 75 देशांमधून येणाऱ्या स्थलांतरित व्हिसा प्रक्रियेला स्थगिती दिल्याची घोषणा केली आहे. अमेरिकेच्या परराष्ट्र विभागानं म्हटलं आहे की, या देशांमधील स्थलांतरित लोक अमेरिकन लोकांकडून अस्वीकाराई दरानं कल्याणकारी योजनांचा लाभ घेतात आणि अमेरिकेत आल्यानंतर ते अनेकदा अमेरिकेवर आर्थिक भार बनतात. नवीन स्थलांतरित लोक अमेरिकन लोकांकडून संपत्तीचा गैरवापर करणार नाहीत याची खात्री अमेरिका करू शकत नाही, तोपर्यंत ही स्थगिती कायम राहील.

**<u>क्रिकेट</u>**

डॅरिल मिशेलच्या नाबाद 131 धावांच्या खेळीमुळं न्यूझीलंडनं काल राजकोट इथं पन्नास षटकांच्या दुसऱ्या सामन्यात 285 धावांचं लक्ष्य अठ्ठेचाळिसाव्यात षटकांत पूर्ण करत भारतावर सात गडी राखून विजय मिळवला आणि तीन सामन्यांच्या मालिकेत 1-1 अशी बरोबरी साधली. डॅरिल मिशेलला सामनावीर ठरला. यजमान संघाकडून केएल राहुलनं सर्वाधिक 112 धावांची नाबाद खेळी केली. मालिकेतील अंतिम तिसरा सामना 18 तारखेला इंदूरमध्ये खेळला जाईल.

**<u>हवामान</u>**

कोकण, मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात आज आकाश अंशतः ढगाळ राहण्याचा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे.

## आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.